नि.फौ.प्र. क्र. –३०३०१४७/२००२

शासन वि. सुनिल व इतर

**<u>नि.क्र. ३७९६</u>**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०६ चा शपथेवर सरतपास (आरोपी क्र.३ साठी)</u>**

माझे नाव – बंडू मुकुंदराव कांबळे,

वय – ६३ वर्ष, व्यवसाय – सेवानिवृत्त्.

राहणार – अजयनगर, रामनगर, हिलटॉप, नागपूर.

**<u>सरतपास – अभियोगपक्षा तर्फे विशेष सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती व्ही.सी.चावरिया यांच्या मार्फत –</u>**

१. दि.१८.०५.२००२ रोजी पोलीसांनी मला नागपूर येथील गुन्हे अन्वेशन शाखेच्या (CID) कार्यालयात पंच म्हणून बोलाविले होते. सदर कार्यालयामध्ये संजय अग्रवाल नावाचा व्यक्ती हजर होता. सदर संजय अग्रवाल याच्या नमुना सहया घेण्याच्या होत्या. सदर संजय अग्रवाल याच्या नमुना सहया माझ्या समक्ष घेण्यात आल्या. आता साक्षीदारास निशानी क्र.१३८४ ते १३८९ वरील नमुना सहया दाखविण्यात आल्या. साक्षीदार सांगतात की, सदरच्या नमुना सहया हया त्यांच्यासमक्ष घेण्यात आल्या होत्या. सदर पंचनाम्यांवर अनु.क्र.१ वर माझ्या सहया आहेत. सदर पंचनाम्यांमधील मजकुर बरोबर आहे. सदर सहा पंचनाम्यास अनुक्रमे **निशानी क्र.१३८४/अ–३** ते **१३८९/अ–३** देण्यात येते. संजय अग्रवाल यास आज रोजी पाहील्यास मी ओळखू शकतो. आरोपी क्र.३ संजय अग्रवाल आज रोजी न्यायालयासमोर हजर नाही. (स्वतःची ओळख आव्हाणीत करणार नाही या अटीवर आरोपी क्र.३ यास आज रोजी निशानी क्र.३७९७ वरील अर्जान्वये आज रोजी गैरहजेरीची माफी देण्यात आली आहे.)

२. वर नमुद सहा पंचनाम्यांसाठी दुसरा पंच दिपक हरिभाऊ देवघरे, राहणार शांतीनगर हा हजर होता. आम्ही दोघे एकाच ठिकाणी नोकरी करत होतो, त्यामुळे मी दिपक हरिभाऊ देवघरे यास ओळखतो. वर नमुद पंचनामे निशानी क्र.१३८४/अ–३ ते १३८९/अ–

३ यावर दुसरा पंच दिपक हरिभाऊ देवघरे याने माझ्यासमक्ष सहया केल्या आहेत.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपी क्र.३ तर्फे वकील श्री. पंकज तांबोळी यांच्यातर्फे**

३. नागपूर येथील राज्य गुन्हे अन्वेशन शाखेमधून मी सन २०२२ मध्ये सेवानिवृत्त झालो आहे. वर नमुद पंचनाम्याकामी हजर राहणेसाठी पोलीसांनी मला लेखी नोटीस दिली नव्हती. सदर पंचनाम्यांकामी हजर राहण्यासाठी मी माझ्या वरिष्ठांची तोंडी परवानगी घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, वर नमुद पंचनाम्यांवर माझ्या सहया गणेशपेठ पोलीस स्टेशनमध्ये घेतल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष कोणतेही पंचनामे झाले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण / फेरतपास नाही.

समक्ष / श्रवणोत्तर स्वीकृत

MAHESH VIJAYKUMAR PHADE

Digitally signed by MAHESH VIJAYKUMAR PHADE
Date: 2026.03.10 14:01:09 +0530

(एम.व्ही.फडे)

दिनांक – १०.०३.२०२६

२रे अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,

नागपूर